# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३२७** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१६/०९/२०२५ मंगळवार रोजी सायंकाळी– ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१६/०९/२०२५ मंगळवार रोजी सायंकाळी– ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१६/०९/२०२५ मंगळवार रोजी सायंकाळी– ५.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४२ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र :-३२८** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./नर/५९१/२०२५-२६ दि.३१/०७/२०२५
३. रचना सहाय्यक यांचा दि.०७/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.०८/०७/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ११८ नुसार शैक्षणिक कामाकरिता जागा उपलब्ध करुन देणेबाबत चा समजा सोशल वेलफेअर सोसायटी चा पत्र क्र.१६३४ दि.०९/१०/२०२४ चा अर्ज.

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

नगररचना विभागाकडिल पत्र क्र.८४९ अन्वये अर्जदार संस्था यांना त्रुटीपत्रानुसार त्रुटींची पुर्तता (कागदपत्रांची पुर्तता) करणेबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार अर्जदार समजा सोशल वेलफेअर यांनी दि.१४/१०/२०२४ चे पत्रान्वये शैक्षणिक वापराकरिता आवश्यक असलेल्या जागांचे ७/१२ उतारा, मोजणी शिट मंजुर अभिन्यांसाची प्रत, समजा सोशल वेलफेअर ची कागदपत्रांची छायांकीत प्रत इत्यादी. कागदपत्रे पुर्ततापत्रा सोबत सादर केली आहे. अर्जदार संस्थेने दि.१४/१०/२०२४ चे पत्रान्वये सादर केलेल्या कागद पत्रांचे अवलोकन केले असता सदर कागदपत्रास अर्जदार यांनी मौजे मेहरूण स.नं. २८८/१/२/अ/ओपन स्पेसचा ७/१२ उतारा, मौजे मेहरूण स.नं. २८९/१ मधील जळगाव शहर म.न.पा मालकीचा ७/१२ उतारा, समजा सोशल वेलफेअर सोसायटीचे नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत, मौजे मेहरूण स.नं.२८८/१क चे तात्पुरत्या अभिन्यास मंजुरीचे प्रत्र क्र. ३०२ दि.१५/०५/२०२४. मौजे मेहरुण स.नं.२८८ च्या मोजणीशीटची छायांकीत प्रत, मौजे मेहरूण स.न. २८९/१ च्या सिमांकीत अभिन्यासाची छायांकीत प्रत तसेच सिमांकीत मोजणी नकाशाची छायांकीत प्रत या प्रमाणे कागद जोडलेली आहेत.

वरील कागदपत्रानुसार मौजे मेहरुण स.नं.२८९/१ या जमिनीवरील आ.क्र.२५३, माध्यमिक शाळा, व आ.क्र. २५४ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ही जागा हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर) प्रमाणपत्र क्र.४६. दि.१०/११/२०१४ च्या मोबदल्यात महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली आहे. तसेच मौजे मेहरुण स.नं.२८८/१क, आ.क्र.२५४ माध्यमिक शाळा व खेळाचे मैदान ही जागा आर.सी.सी. प्रमाणपत्र क्र.२२८, दि.०३/०९/२०२४ अन्वये महानगरपालिकेस हस्तांतरीत केलेली असल्याचे अभिलेखी दिसुन येते.

अर्जदार संस्थेस मौजे मेहरूण स.न. २८८/१/२ ही खुली जागा सदर अभिन्यासातील उपभूखंड धारकांच्या संमती शिवाय वापरास देणे नियमाकुल होणार नाही. त्या करीता अर्जदार संस्थेने भुखंड धारकांचे ना हरकत पत्र व इतर वैधानिक बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. तसेच खुल्या जागेवरील कोणतेही बांधकाम करतांना अनुज्ञेय चटई निर्देशांकाच्या तरतुदी व्यतिरीक्त, एकत्रिकृत बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (डिसे. २०२०) विनिमय क्र.३.४.७ (i) आणि (ii) मधील तरतुदी लागु राहतील.

त्या बरोबर अर्जदार संस्थेने मौजे मेहरूण स.नं.२८९/१ मधील आरक्षण क्र.२५४, हायस्कुल व ग्राऊंड, आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव यांच्या मालकीचा ७/१२ उतारा सादर केला आहे व त्या अनुषंगाने सदरची जागा शैक्षणिक वापराकरीता म.प्रा. व न. र अधिनियम १९६६ चे कलम ११८ मधील तरतुदीच्या अनुषंगाने अपेक्षलेली आहे. तथापि उक्त कलमानुसार विकास प्राधिकरणास राज्य शासनाच्या संमती खेरीज दिर्घ कालावधीसाठी कोणत्याही जमिन विकण्याची किंवा पट्ट्याने देण्याची सक्ती असणार नाही. अशी तरतुद आहे. तसेच महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये

महानगरपालिका मालकीची जागा एक वर्षापेक्षा जास्त कालावधी करीता देता येईल तथापि, त्यास राज्य शासनाची मंजुरी घेणे आवश्यक राहिल असे नमुद आहे. तसेच महानगरपालिका मालकीच्या स्थावर मालमत्तेचे भाडे पट्ट्याद्वारे हस्तांतरण आणि भाडे पट्ट्याचे नुतनीकरण याबाबत दि.२६ एप्रिल २०२३ च्या शासन अधिसुचना/ राजपत्राच्या अनुषंगाने कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम भाडे व सुरक्षा ठेव निर्धारण समिती द्वारे भाडेपट्ट्याची रक्कम निश्चित करणे बाबत अधिसुचीत केलेले आहे. तदनंतर सदर अधिसुचनेत नमुद केल्या प्रमाणे महापालिकेच्या मालमत्ता भाडेपट्ट्याने देण्याची कार्यपध्दती तसेच भाडे पट्ट्याचा कालावधी निश्चित करणे कामीच्या प्रक्रीयेचा अवलंब करुन कार्यवाही करणे योग्य राहील.

उक्त अधिसूचनेत " भाडेपट्टयाचा कालावधी :- महानगरपालिका आणि भाडेपट्टाधारक यांनी परस्पर सामंजस्याने भाडेपट्ट्याचा अथवा नुतनीकरणाचा कालावधी निश्चित करावा. भाडेपट्ट्याचा कालावधी प्रथमतः दहा वर्षांपर्यंतचा असेल. भाडेपट्ट्याचा एकुण कालवधी तीस वर्षापेक्षा जास्त नसावा." असे नमुद आहे.

त्यानुसार सर्वप्रथम मौजे मेहरुण स. नं.२८९/१ मधील आ.क्र.२५४, हायस्कुल व प्लेग्राउंड या आरक्षणा खालील म.न.पा मालकीची जागा संबंधीत संस्थेस विक्री करणे अथवा भाडे पट्याने देणेबाबत शासन राजपत्र दि.२६/०४/२०२३ च्या अनुषंगाने, जागा विक्री न करता भाडेपट्ट्याने देणे बाबत निर्णय होणे उचित होईल असे मत आहे. त्यानुसार मौजे मेहरुण स.नं.२८९/१ हायस्कुल व ग्राउंड या आरक्षणा खालील मनपा मालकीची जागा अर्जदार संस्थेस भाडेपट्ट्याने द्यावयाची झाल्यास शासनाच्या उक्त अधिसुचनेनुसार कार्यवाही होणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४३** **(महासभा)**

---

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र :-३२९** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./न.र./८२२/२०२५ दि.०३/१०/२०२५
३. रचना सहाय्यक यांचा दि.०१/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. नगररचनाकार यांचा दि.०१/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.०३/१०/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.०३/१०/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मौजे मेहरुण स.नं.१८० पैकी या जमिनीस नाविकास विभागातुन वगळून रहीवास विभागात समाविष्ठ होणे कामी शासनास कलम ३७ अन्वयेचा फेरबदलाचा प्रस्ताव सादर करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मौजे मेहरुण येथील सर्व्हे नं. १८०पै. उत्तरेकडील क्षेत्र (मोजणी नकाशा नुसार सर्व्हे नं. १८०/१- क्षेत्र हे. ०१.७२ आर. १८०/२- क्षेत्र हे. ०१.७२ आर व १८०/३- क्षेत्र हे. ००.४० आर) असे एकुण क्षेत्र हे. ०३.८४ आर ही जमीन ना-विकास विभागातून वगळून क्षेत्र रहीवास विभागात समाविष्ठ होणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणे करीता अर्जदार श्री.चंद्रकांत भागवत पाटील व इतर यांच्या दि.२१/०७/२०२५ अन्वयेच्या अर्जानुसार जमीन ना-विकास विभागातून वगळणे कामी कार्यवाही सुरु करणेकामी प्रथम प्रशासकीय ठराव क्र.३०९, दि.१९/०८/२०२५ रोजी पारित झालेला आहे. त्या अनुषंगाने उक्त फेरबदला बाबतच्या जाहिर सुचनेच्या इंग्रजी व मराठी प्रती शासन राजपत्रात प्रसिध्द करणेकामी आयुक्त यांचे मान्यतेने दि. २९/०८/२०२५ रोजी दैनिक सकाळ वृत्तपत्रात तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात, भाग-१, दि. २८/०८/२०२५ पृष्ठांक १२ ते १३ वर प्रकाशीत झालेली आहे. तसेच प्रशासकीय इमारत मजला क्र.१५. जळगाव शहर महानगरपालिका, जळगाव येथील सहायक संचालक, नगररचना यांचे कार्यालयात जाहीर नोटीस डकविण्यात आलेली असुन त्याची प्रत मा. सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग नाशिक व मा. संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडेस दिलेली आहे.

सदरची जाहिर सुचना प्रसिध्द होऊन एक महिन्या पेक्षा जास्त कालावधीत झालेला असुन, हरकती सूचना मागविण्याच्या विहीत कालावधीत एकही हरकत अथवा सुचना प्राप्त झालेली नाहीत.

प्रश्नाधीन जमिनीची प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ निरिक्षण पाहणी केली असता सदर जमीन संपूर्णतः सेक्टर नं.७ (ना-विकास विभाग) चे उत्तर पूर्व कोप-यात आहे आणि सेक्टर नंबर ५ चे पश्चिमेस असून सदर जमिनीच्या पुर्वेस १८.०० मी. रुंद विकास योजना रस्ता व त्या पलीकडे रहिवास वापर व उत्तरेस सुध्दा रहिवास वापर असून त्या अनुषंगाने अभिन्यास मंजुर झाले असुन दोन्ही बाजुचा भाग संपुर्णतः विकसीत झाला आहे व प्रत्यक्षात बांधकामे होऊन रहिवास वापर सुरु आहे.

तरी अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमीन ना-विकास विभागातुन वगळून रहिवास विभागात समाविष्ठ करावयाची झाल्यास नियोजन प्राधिकरण या नात्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

त्या अनुषंगाने उक्त जमिनी लगत १८.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील रुंदीकरणाच्या जागेच्या आरक्षणाच्या स्थितीत व संरेखनात कोणताही बदल न करता अर्जदार यांची मागणी नुसार प्रस्तुत जमीन ना-विकास विभागातून वगळणे कामी म.प्रा.व.न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वये ची रहिवास विभागात समाविष्ठ करणेची कार्यवाही करणे कामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये अधिसुचना प्रसिध्द करणेकरीता शासनास प्रस्ताव सादर करावयाचा असल्याने त्यास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र :-३३०** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./न.र./८४४/२०२५ दि.१५/१०/२०२५
३. रचना सहाय्यक यांचा दि.१३/१०/२०२५ चा अभिप्राय.
४. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा दि.१३/१०/२०२५ चा अभिप्राय.
५. आयुक्त यांचा दि.१४/१०/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३०.०० मी रुंद रस्त्याची आखणी बदलणे व त्या खालील मुक्त होणारे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे बाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

श्री. नामदेव वसंत वंजारी रा. मेहरुण जळगाव यांनी मा.ना. नगरविकास मंत्री यांना दिलेल्या दि.०४/०५/२०२२ च्या पत्राच्या अनुषंगाने कार्यासन अधिकारी यांनी महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.टीपीएस/३५२२/१०१६/२०२२/नवि-९, दि.०७/०६/२०२२ चे पत्रानुसार या कार्यालयाचे अभिप्राय अपेक्षिलेले होते. त्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी सविस्तर अहवाल महासभे पुढे सादर केला असता महासभा ठराव क्र.९८५ दि.१५/०२/२०२३ अन्वये, मेहरुण स.नं. ४५५/१ मधील ३०.०० मी रस्त्याच्या संरेखनात बदल करणे बाबतचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आलेला आहे. तथापी त्या पुर्वीच जळगाव म.न.पा ने आयुक्त जळगांव शहर महानगरपालिका यांचे शासनास उद्देशुन पत्र जा.क्र/नर/४३४ दि.१४/०६/२०२२ अन्वये विषयांकीत फेरबदलाची शिफारस करणारा अहवाल शासनास सादर केलेला आहे.

अर्जदार यांनी पुनश्च या कार्यालयाकडे शासन पत्र क्र.टीपीएस/३५२२/५९१/२०२५/नवि-९ दि.१४/०५/२०२५ रोजीचे पत्रान्वये मेहरुण स.नं.४५५/१ मधील ३०.०० मी रस्त्याच्या संरेखनात बदल करणे बाबत कलम ३७ अन्वयेची कार्यवाही करणे बाबत विनंती केलेली आहे.

जळगांव शहराकरीता अधिसुचना क्रं क्र.टी.पी.एस.३५९९/७३८/ सी.आर. १४२ (ए) युडी- ९ दि.११/०२/२००२ अन्वये शासनाने मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मंजुर केलेली असुन उक्त विकास योजना दि.०७/०४/२००२ पासून अंमलात आहे तसेच वगळलेल्या भागाची विकास योजना (इ.पी) शासनाने अधिसुचना क्र.टी.पी.एस. ३५०३/४९३/ सी.आर-१०२ (ए) /०३ युडी-९ दि.१०/०८/२००४ द्वारे मंजूर केलेली आहे व ती दि.०१/१०/२००४ पासून अंमलात आलेली आहे.
या मंजूर विकास योजनेत मेहरुण...

स.नं.४५५/१ ३०.०० मी रुंद डी.पी.रोड. प्लेग्राऊंड (भागशः) व उत्तरेकडील भाग रहिवास विभाग. स.नं.४५५/२ - ३०.०० मी रुंद डी.पी. रोड (भागशः) व्हिजीटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर (भागशः) आणि प्लेग्राऊंड (भागशः)

स.नं.४५५/३ - व्हिजीटेबल मार्केट व शॉपिंग सेंटर (भागशः) आणि प्लेग्राऊंड (भागशः)

या प्रमाणे आरक्षित दर्शविलेले आहे. तसेच उपरोक्त मेहरुण स.नं. ४५५ चे हद्दीस लागून उत्तरेस मेहरुण स.नं. ४५३ व ४५४/पैकी या जमिनी असुन मेहरुण स.नं.४५३ च्या पश्चिम दक्षिण कोप-यापासुन ते मोहाडी रस्त्यापर्यंत ९.०० मी. रस्ता आहे. या रस्त्या पेकी काही भाग स.नं. ४५३ या मंजुर अभिन्यासातील रस्ता आहे व पुढे स.नं. ४५४ पैकी मध्ये ९.०० मी रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित दर्शविलेला आहे.

उपरोक्त आरक्षणा खालील क्षेत्र मा. उच्च न्यायालायच्या निर्णयानुसार (३०.०० मी रुंद वि.यो. रस्ता वगळता) व्यपगत झालेले असून त्या नुसार शासनाने आरक्षण व्यपगत झाल्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. अर्जदार यांनी आता ३०.०० मी रुंद वि.यो रस्त्याची आरेखीत फेरबदल करण्याची विनंती केली आहे.

अर्जदार यांची मागणी विचारात घेता प्रचलीत एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली डिसे-२० मधील तरतुद नियम क्र.३.११ रिलोकेशन ऑफ डी.पी. साईट्स/रोड्स या बाबतची तरतुद नमुद आहे. यात रस्त्याच्या रिलोकशन बाबत खालील प्रमाणे नमुद आहे.

In case of shifting of road alignment, the same shall be allowed without change in the inlet & outlet points and also, without affecting smooth flow of traffic.

मंजुर विकास योजने मध्ये ३०.०० मी रुंद रस्ता अर्जदार यांच्या स.नं. ४५५/१ या मधुन प्रस्तावित आहे. या प्रस्तावित रस्त्यामुळे अर्जदार यांचे स.नं. ४५५/१ मध्ये उत्तरेकडील भागात त्रिकोणी स्वरुपात क्षेत्र शिल्लक राहत असुन ते रेखांकन तयार करण्याच्या दृष्टीने योग्य आकाराचे राहत नाही असे मत आहे. अर्जदार यांच्या स.नं. ४५५/१ या जागेच्या उत्तर बाजुस सोबतच्या नकाशात दर्शविल्यानुसार ९.०० मी रुंद रस्ता हा मंजुर रेखांकनाचा भाग आहे. आरक्षण क्र. १३२ प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान या आरक्षणाच्या दक्षिणेकडील काही भाग रेखांकना अंतर्गत रस्त्याचा भाग नाही, तथापि तो विकास योजने मध्ये लाल रंगाने ९.०० मी रुंद रस्ता प्रस्तावित दर्शविलेला आहे. अर्जदार यांचे मागणीनुसार बदल केल्यास सोबतच्या भाग नकाशामध्ये दर्शविल्या प्रमाणे ३०.०० मी रुंद रस्त्याची आखणी प्रस्तावित होईल. या ३०.०० मी रुंद रस्त्यापैकी उत्तरेकडील ९.०० मी रुंद रस्ता हा लेआऊट अंतर्गत रस्ता असल्याने व तो विद्यमान असल्याने म.न.पा भूसंपादना खालील क्षेत्र कमी होईल. भूसंपादनाचा खर्च कमी होईल (३०.०० मी ऐवजी २१.०० मी रुंद रस्त्याचे भुसंपादन करावे लागेल) उपरोक्त प्रमाणे रस्त्याच्या आखणीत फेरबदल केल्यास, आरक्षण क्र. १३५ प्लेग्राऊंड या आरक्षणास पश्चिम उत्तर कोप-यात अंदाजे ३०.०० मी रुंद रस्त्याचा पुढावा मिळत आहे. त्याबाबत सादर करण्यात येते की, विकास योजनेतील विद्यमान उत्तर-दक्षिण १८.०० मी रुंद रस्त्याचा पुर्वस ३०.०० मी रुंद रस्त्याची आखणी प्रस्तावित आहे.

प्रचलीत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत नियम क्र.३.११ मधील तरतुदी विचारात घेता ३०.०० मी रुंद रस्त्याच्या इनलेट मध्ये बदल होत नाही. तथापि आऊट लेट मध्ये बदल होत असुन तो उत्तरे कडे थोड्या अंतरावर स्थलांतरीत होत आहे. मात्र या बदलामुळे मार्ग सुलभते मध्ये अडचण येणार नाही अशी या कार्यालयाची धारणा आहे. सद्यस्थितीत जळगाव शहराची वि. यो सुधारीत करण्याचे काम सुरु असून १८.०० मी रुंद रस्त्याचे पुर्वेकडील ३०.०० मी रुंदीचा भाग हा वनविभागाच्या लांडोरखोरी उद्यानातुन जात असुन, वन विभागाच्या मालकीच्या जागेतून सदर ३०.०० मी रुंद रस्ता अस्ती त्वात येणे अवघड दिसुन येते.

अर्जदार यांनी मेहरुण स.नं. ४५५/१ व ४५५/२ भागशः यातून प्रस्तावित असलेल्या ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याच्या संरेखनात बदल करुन मेहरुण स.नं. ४५१/१ व मेहरुण स.नं.४५४ पैकी यांच्या दक्षिण हद्दीस (मेहरुण स.नं. ४५३ व ४५४ मधील ९.०० मी. रस्त्याचा भाग ३०.०० मी डी.पी. रोड मध्ये समाविष्ट करुन) १८.०० मी.डी.पी. रस्त्यास (मोहाडी रोड) जोडणे या प्रमाणे संरेखनात बदल करणे बाबत पुनःश्च मागणी केलेली आहे.

वरील प्रमाणे संरेखनात बदल केल्यास सदरचा ३०.०० मी रस्ता हा १८.०० मी रुंद विकास योजना रस्त्यास जोडला जाईल व १८.०० मी. रस्त्यावर काही अंतराने परत सदर ३०.०० मी डी.पी. रोड सेक्टर नं.०६ च्या हद्दीने दर्शविलेला आहे. या प्रमाणे संरेखनात फेरबदल होतील. तसेच वरील प्रमाणे संरेखनात फेरबदल केल्यामुळे महानगरपालिकेस ३०.०० मी डी.पी. रोडच्या भुसंपादनाच्या मोबदल्या ऐवजी फक्त २१.०० मी रस्त्याच्या जागेचे (मंजुर रेखांकनातील ९.०० मी रुंद रस्त्याचे क्षेत्र वगळता) भुसंपादन करावे लागेल. त्याच प्रमाणे ३०.०० मी. रुंद वि.यो. रस्त्याचे संरेखनात बदल केल्यास ३०.०० मी. रुंद रस्त्याखालील मुक्त होणा-या क्षेत्राचा रहिवास विभागात समावेश करण्याबाबत प्रस्ताव समावेश करावा लागेल.

तरी अर्जदार यांच्या मागणी नुसार ३०.०० मी. रुंद रस्त्याचे संरेखनात बदल करावयाचा असल्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये कार्यवाही सुरु करणे करीता महासभेच्या मंजुरीची आवश्यकता असल्याने उपरोक्त प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

---

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र :-३३१** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आस्था/१९८९/२०२५-२६ दि.०१/१०/२०२५
३. आस्थापना अधिक्षक यांचा दि.२९/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२९/०९/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.३०/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.३०/०९/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** ज.श.म.न.पा.स आवश्यकतेनुसार विविध विभागांसाठी कुशल, अर्धकुशल कर्मचाऱ्यांची सेवा पुरविणेकामी व त्या अनुषंगाने येणाऱ्या अंदाजीत पर्यायी रक्कम रु.१,७५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार विविध विभागांसाठी कुशल अर्धकुशल कर्मचाऱ्यांची सेवा पुरविणेकामी राबविण्यांत आलेल्या निविदा प्रक्रियेकामी जा. क्र. आस्था/११७२/२०२५-२६ दिनांक २५/०७/२०२५ नुसार दैनिक सकाळ या वृत्तपत्रात ई-निविदा सुचना के ०२ E-Tender Notice No 02/2025 अन्वये ई- निविदा पध्दतीने महाराष्ट्र शासनाच्या http://mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार आलेल्या चार निविदाकारांपैकी रेऑन प्रोटेक्शन प्रा.लि. जळगांव यांची कागदपत्रे परिपुर्ण नसल्याने त्यांची निविदेचा विचार न करता परिपुर्ण कागदपत्रे असलेल्या २ मानसी लेबर सप्लायर्स, जळगांव, ३. रॅपीड सिक्युरिटी ॲण्ड लेबर सप्लायर्स, जळगांव, ४. ओम साई असोसिएटस, नागपुर यांच्या निविदा समितीसमोर सादर करण्यांत आलेल्या होत्या. त्यामध्ये मानसी लेबर सप्लायर्स, जळगांव यांची निविदा दर हे रु.५०१/- सेवाशुल्क असे जास्तचे आलेने उर्वरीत दोन्ही निविदाकारांनी त्यांचे दर हे समसमान म्हणजेच प्रति कामगार प्रति माह रु.१.००० (एक रुपया) सेवाशुल्क असे आलेने व त्यापैकी ओम साई असोसिएट्स, नागपुर यांनी निविदा प्रक्रियेतुन माघार घेत असल्याचे व सदरचे सेवा पुरविणेचे काम रॅपीड सिक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लायर्स, जळगांव यांना देण्यास हरकत नसल्याचे लिखीत पत्र दिलेले होते. त्यानुसार निविदा समितीने रॅपीड़ सिक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लायर्स, जळगांव यांचे प्रति कामगार प्रतिमहा रु.१.००० (एक रुपया) सेवाशुल्क चे दर स्विकारले होते. त्या अनुषंगाने महासभेकडेस प्रस्ताव सादर केला असता प्रशासक ठराव क ३२३ दि.१६/०९/२०२५ ला मान्यता मिळालेली असुन सदर ठरावाव्दारे रॅपीड सिक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लायर्स जळगांव यांचेकडुन करारनामा करुन घेणेसही मान्यता मिळालेली आहे. त्या अनुषंगाने रॅपीड सिक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लायर्स, जळगांव या निविदाकारांकडुन रु.१.००० मात्र सेवाशुल्क दरानुसार सेवा पुरविणेकामी रु.१.७५,००,०००/-चा करानामा करणेत येत आहे.

सदर निविदाकार रॅपीड सिक्युरीटी ॲण्ड लेबर सप्लायर्स, जळगांव यांचेकडून करारनामा करतांना निविदेमध्ये नमुद केलेल्या अटी शर्ती नुसार करारनामा करण्यांत येत असल्याने सदर निविदेतील अट क्रं.६ मध्ये सदर कामाचे कंत्राटाची मुदत सर्व साधारणपणे कामाचा आदेश दिल्याचे तारखेपासून अकरा महिने अशी आहे. सदरच्या निविदेची आवश्यक पदांची मुदत / संख्या तसेच इतर पदनाम व संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेला आहे. काही कारणांमुळे कंत्राटाची मुदत संपुष्टातः आल्यानंतर पुढील कंत्राट मंजूर होईपर्यंत वाढीव दर न आकारता सदरचे काम करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. असे नमुद केलेले असल्याने व निविदेत विविध ३३ कुशल, अर्धकुशल कर्मचारी पुरविणेबाबत नमुद असल्याने त्यासाठी अदमासे खर्च रु.७५,००,०००/- होणार आहे व भविष्यात सदर पदांची संख्या वाढल्यास त्यासाठी होणाऱ्या खर्चासही मान्यता असावी व सदरची बाब ही आर्थिक स्वरुपाची असल्याने त्यासाठी येणारे अंदाजीत पर्यायी खर्च रक्कम रुपये १,७५,००,०००/- मात्रला मान्यता मिळणेसाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र :-३३२** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा/विदयुत/२३९/२०२५-२६ दि.०१/१०/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.१६/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२३/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. अतिरीक्त आयुक्त यांचा दि.१६/०९/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.२५/०९/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** मनपा शाळा व महाविदयालये तसेच दवाखाने इत्यादी ठिकाणी सौर संयत्र बसविणे बाबत तांत्रिक मान्यता मिळणे कामी सदर प्रस्ताव महाराष्ट्र ऊर्जा राज्य अभिकरण, जळगांव यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

**शासनाच्या १०० दिवसांच्या कृती आराखड्यात माननीय मुख्यमंत्री यांनी सौर ऊर्जा प्रकल्पांना चालना देणे व सर्व प्रशासकीय कार्यालय येथे वीज देयकांच्या बचतीसाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणेबद्दल कामे सुचित केले आहे.**

**त्या अनुषंगाने जळगाव शहर महानगरपालिके अंतर्गत १) नानीबाई रुग्णालय, २) प्रभाग समिति क्र. २ येथे असलेले मुलतानी रुग्णालय, ३) निर्मलाबाई लाठी शाळा, ४) प्रभाग समिति क्र. १ अंतर्गत असलेले डी. बी. जैन रुग्णालय, ५) प्रभाग समिति क्र. २ येथे असलेले चेतनदास मेहता रुग्णालय, ६) प्रभाग समिति क्र. ३ अंतर्गत मनपा प्राथमिक उर्दू शाळा क्र. ३६/५६, ७) प्रभाग समिति क्र. ३ मनपा उर्दू शाळा क्र.४१ मेहरुण, ८) प्रभाग समिति क्र. १ अंतर्गत भजे गल्ली येथील सुवर्ण जयंती बेघर निवारा केंद्र, ९) मनपा शाळा क्र.१ शिवाजी नगर इत्यादी आहेत. रुग्णालयात रुग्ण हे तपासणी करायला येत असतात, तेथे रुग्ण तपासणी साठी लागणाऱ्या उपकरणाचा सतत वापर सुरू असल्याकारणाने व तसेच शाळा, रुग्णालय व बेघर निवारा केंद्र येथे लाईट, फॅन सतत सुरू असल्याने तेथे अनुषंगिक विद्युत साहीत्यांचा वापर होत असतो. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात विजेचा वापर होत असतो. त्या अनुषंगाने रुग्णालय व शाळा येथे प्रत्येकी १० kw व बेघर निवारा केंद्र येथे १५ kw क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारल्याने प्रत्येक महिन्याला येणाऱ्या विज देयकात आर्थिक बचत होणार आहे. सदर प्रकल्पामुळे शाळा, रुग्णालय व बेघर निवारा केंद्र येथील मासिक वीज खर्चाची मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.**

**त्यानुसार वरील सर्व ठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सदर कामी जिल्हादर सूची सन २०२२-२३ नुसार एकूण ९ ठिकाणचे वेगवेगळ्या रक्कमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.**

**प्रस्तृत कामी महाराष्ट्र ऊर्जा राज्य अभिकरण यांची तांत्रिक मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्यानुसार अंदाजपत्रकीय खर्चाच्या १% रक्कम तांत्रिक मंजुरी शुल्क म्हणून अदायगी करावे लागणार आहे.**

**तरी शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०२५/प्र.क. १९/नवि-१६ (ई-९३१९६४) दि.२९ एप्रिल २०२५ नुसार महानगरपालिका क्षेत्रांत मुलभुत सोई सुविधांचा विकास व वैशिष्ट्यपुर्ण या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विज देयकात बचत करण्यासाठी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे या कामाचा समावेश करुन सदर प्रकल्प प्राधान्याने मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. सौर ऊर्जा प्रकल्पाच्या अमंलबजावणी बाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत.**

**१) सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था पात्र राहतील.**

**२) वित्तीय आकृति बंध,**

**तसेच प्रकल्प किमतींपैकी राज्य शासनाचा व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा पुढील प्रमाणे राहील.**

| अ.क्रं. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | राज्य शासनाचा हिस्सा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | क व ड वर्ग महानगरपालिका | ७०% | ३०% |

**सौर ऊर्जा प्रकल्प शासन मान्यतेस सादर करतांना सौर ऊर्जा प्रकल्पाकरीता आवश्यक असलेल्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बँकेत जमा असणे आवश्यक आहे.**

**सौर ऊर्जा प्रकल्पासाठी अनुदानाचे वितरण खालील प्रमाणे तीन हप्त्यांमध्ये केले जाईल.**

**१) पहिला हप्ताः सौर ऊर्जा प्रकल्पाचा कार्यारंभ आदेश दिल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ३०% निधी वितरित करण्यात येईल.**

**२) दुसरा हप्ताः सौर ऊर्जा प्रकल्पाचे काम पुर्ण झाल्यानंतर मंजूर प्रकल्पाच्या ५०% निधी वितरित करण्यात येईल.**

**३) तिसरा हप्ताः सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित होऊन प्रत्यक्ष विज बचतीचे पहिले विज देयक एक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस प्राप्त झाल्यानंतर उर्वरित अनुदानाची २०% रक्कम वितरित करण्यात येईल असे शासन निर्णया मध्ये नमूद केलेले आहे.**

**खालील वेगवेगळया ठिकाणी सोलर यंत्रणा उभारणे कामी अंदाजपत्रकीय खर्च खालीलप्रमाणे आहेत:-**

| अ.क्रं. | स्थळ | क्षमता | रक्कम रु. खर्च | शासनाचे ७०% | मनपा फंडातून ३०% |
|---|---|---|---|---|---|
| १ | नानीबाई रुग्णालय | १० KW | ७९४७३२ | ५५६३१२ | २३८४२० |
| २ | निर्मलाबाई लाठी शाळा | १० KW | ८०१८८३ | ५६१३१८ | २४०५६५ |
| ३ | डी.बी. जैन रुग्णालय | १० KW | ८४७६३८ | ५९३३४७ | २५४२९१ |
| ४ | सुवर्ण जयंती बेघर निवारा केंद्र | १५ KW | १२३२१६३ | ८६२५१४ | ३६९६४९ |
| ५ | मुलतानी रुग्णालय | १० KW | ८३३३३६ | ५८३३३५ | २५०००० |
| ६ | मनपा शाळा क्र.१ शिवाजी नगर | १० KW | ८२३३३६ | ५७६३३५ | २४७००० |
| ७ | मनपा शाळा क्र.४१ | १० KW | ८१६१८५ | ५७१३३० | २४४८५६ |
| ८ | मनपा शाळा क्र.३६/५६ | १० KW | ७९१७९४ | ५५४२५६ | २३७५३८ |
| ९ | चेतनदास मेहता रुग्णालय | १० KW | ८०९०३४ | ५६६३२४ | २४२७१० |
| | एकुण - | ९५ KW | एकुण खर्च ७७,५०,१०१.०० | ५४.२५,०७१.०० | २३.२५.०२९.०० |

**त्याअनुषंगाने सदर प्रस्तावित नानीबाई रुग्णालयाचे एकुण अंदाजित खर्च रक्कम रु. ७७,५०,१०१/- मात्र असून शासनाच्या ७०% अनुदानाच्या अटीनुसार रक्कम रु.५४,२५,०७१/-मात्रचा निधी प्राप्त होणे अपेक्षित आहे. व उर्वरित ३०% रक्कम रु.२३.२५,०२९/- मात्रचा निधी महानगरपालिका फंडातून करण्यात येईल.**

**तरी सदरच्या कामी येणाऱ्या वरीलप्रमाणे ९ ठिकाणचे अंदाजपत्रकीय खर्चास तांत्रिक मान्यता मिळणे कामी महाराष्ट्र ऊर्जा राज्य अभिकरण, जळगाव यांच्याकडे सदरचा प्रस्ताव पाठविणेस** मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र :-३३३** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./जशमनपा/पा.पु.वि./१६८/२०२५ दि.१३/१०/२०२५
३. उपभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. क. अभियंता, प्रकल्प विभाग यांचा दि.२८/०७/२०२५ चा अभिप्राय.
५. शहर अभियंता यांचा दि.०१/१०/२०२५ चा अभिप्राय.
६. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०६/१०/२०२५ चा अभिप्राय.
७. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा अभिप्राय
८. आयुक्त यांचा दि.०८/१०/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** शासकीय वैदयकीय महाविदयालय, मौजे चिंचोली, ता.जि.जळगांव पाणी पुरवठा विभाग योजनेसाठी जळगांव मनपाचे उमाळा जलशुध्दीकरण केंद्र आवारात RCC MBR बांधणेसाठी जागेची परवानगी मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व उपभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, जळगांव यांचेकडील प्राप्त पत्र जा.क्र./ता.शा/१४४/२०२५ दि.०४/०७/२०२५ अन्वये शासकीय वैदयकीय महाविद्यालय, मौजे चिंचोली, ता.जि. जळगाव पाणी पुरवठा योजना प्रस्तावित केलेली आहे. त्या अंतर्गत म.न.पा. जळगाव यांचे कडील उमाळा जलशुद्धीकरण केंद्र येथील आवारात वाघनगर योजनेच्या GSR शेजारी २.७० लक्ष लि. क्षमतेचा व २० मी. उंचीचा RCC MBR बांधणे प्रस्तावित केले आहे. त्याकामी निविदा कार्यवाही तातडीने करण्यासाठी सदर जागेत RCC MBR बांधणेकामी परवानगी मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

मात्र जळगांव शहराची वाढती पाण्याची मागणी बघता केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान व नगरोत्थान अभियाना अंतर्गत जलशुद्धीकरण केंद्राचा विस्तार करण्यात येणार आहे, त्याकामी प्रक्रीया सध्यस्थितीत चालू आहे.

तरी सदरील प्रक्रीया ही प्रकल्प विभागामार्फत पार पाडण्यात येत असून, जागेच्या नियोजनाबाबत प्रकल्प विभागाने पूढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

मौजे चिंचोली ता.जि जळगाव येथील शासकीय वैदयकीय महाविदयालय पा.पु योजनेकरीता जळगाव म.न.पा.चे उमाळा जलशुध्दीकरण केंद्राच्या आवारात R.C.C MBR बांधणेकामी (वाघ नगर पा.पु योजनेच्या GSR शेजारी ) आवश्यक २०x२०m जागा देणेस हरकत नाही. सदरच्या जागेची भाडेआकारणी करणे व त्यात दरवर्षी होणारी दरवाढ सुचवणेकामी सदरचा प्रस्ताव नगररचना विभागाकडे सादर केला असता नगररचना विभागाने पूढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

म.न.पा चे उमाळा जलशुद्धीकरणचे आवारात २०x२०m जागा उपलब्ध करून द्यावयाची असल्याने वरील २०x२० मी जागेचे भाडे दर महा रक्कम रु. २१२१/- इतके निश्चित केले आहे. तसेच (टीप: प्रति वर्षी भाडे १०% भाडेवाढ करण्यात यावी) नकाशात सीमारेषा ठरवून कार्यवाही करणे आवश्यक राहील.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमा चे कलम ७९ (क) नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांना जागा भाडेपट्टयाने देण्यास मंजुरीस व कलम ७९(क) नुसार नगररचना विभागाने निश्चिती केलेले मूल्य आकारणीस मान्यता मिळणेसाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र :-३३४** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मा.व्य.वि./२०६७/२०२५-२६ दि.१४/१०/२०२५
३. मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा दि.११/०६/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१३/०६/२०२५ चा अभिप्राय.
५. उपायुक्त यांचा दि.१२/०६/२०२५ चा अभिप्राय
६. आयुक्त यांचा दि.३०/०९/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** गटई कामगार यांना जळगांव मनपा क्षेत्रात व्यवसाय करणे कामी जागा देणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

वाचा क्र.१ व मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्रमांक गटई -२०३/प्र.क्र.२०९/मावक-२ दिनांक १३ फेब्रुवारी २००८ शासन निर्णय अन्वये गटई कामगारांना ऊन,वारा,पाऊस यापासुन संरक्षण मिळावे, तसेच त्याची आर्थिक उन्नती व्हावी याकरीता ग्रामपंचायत व नगरपालिका क्षेत्रात १००% शासकीय अनुदानातून गटई कामगारांना पत्राचे स्टॉल देण्याची योजना शासन निर्णय क्रमांक-विघयो-१०९७/प्र.क्र.१७५/ मावक-२ दिनांक ३१/१२/१९९७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत व क वर्ग नगरपालिका क्षेत्रासह या योजनेची व्याप्ती '१ अ वर्ग' व 'ब वर्ग' नगरपालिका आणि छावणीक्षेत्र (कॅन्टॉन्मेंट बोर्ड ) व महानगरपालिका क्षेत्रात वाढवून सदर योजना सन २००७-२००८ या वर्षापासून राबविण्यास शासनाने अटी-शर्तीसह मान्यता दिली आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्र.-९५३ दिनांक २३/१२/२०२२ नुसार जळगांव शहरातील गटई चर्मकार बांधवांना उन,वारा,पाऊस याची तमा न बागळता रस्त्याच्या कडेला आपला व्यवसाय करतात त्यांना वाहतुकीस अडथळा येणार नाही अशा रितीने रस्त्याच्या कडेला व्यवसाया करीता ४X५ फूटाची जागा देणेस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील गटई कामगारांना व्यवसाय करणे कामी मनपा तर्फे रस्त्याच्या कडेला ११ महिन्या करीता जागा देणेत आली होती. तसेच गटई चर्मकार व्यवसायीकांचे नुतणीकरण करण्यात आले होते.

वरील प्रमाणे शासन मान्यतेच्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका गटई कामगारांना खालील प्रमाणे अटी शर्ती पुर्ण करुन व नगररचना विभाग निश्चित करुन दिलेल्या जागा भाडेदरा प्रमाणे तसेच अतिक्रमण विभागाच्या अभिप्रायानुसार जागा उपलब्ध करुन देता येईल.

१) जागा मागणी बाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज.
२) शहर वाहतुक विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग यांचे स्टॉल देणे बाबत नाहरकत पत्र.
४) जागेचा स्थळ दर्शक नकाशा.
५) ओळखीचा व रहिवास पुरावा.
६) किरकोळ वसुली विभागाचा थकबाकी नसले बाबत नाहरकत.

उपरोक्त प्रमाणे जागा मागणी बाबतच्या विहीत नमुन्यातील अर्जा सोबत कागदपत्र पुर्तता करणाऱ्या गटई कामगारांना नगररचना विभागाने निश्चित केलेल्या ०९ मि.ते २० मि. रुंदीच्या रस्त्यावर जागा भाडेदरा नुसार जागा उपलब्ध करुन देता येईल. परंतु एका जागेकरीता एकापेक्षा अधिक मागणी अर्ज प्राप्त झाले असल्यास अर्जदारांकडून बंद पाकिटात नगररचना विभागाने ठरवून दिलेल्या भाडेदरा पेक्षा जादा भाडे मागवून जो अर्जदार जादा भाडे रक्कम देईल त्यास प्राधान्य देता येईल. तसेच अर्जदारांकडून खालील अटी-शर्तीचा ११ महिने कालावधीचा करारनामा करुन जागा देता येईल.

१) जळगांव शहर महानगरपालिका ठरवून देईल त्या जागेवर स्टॉल उभारणी करता येईल.
२) जळगांव शहर महानगरपालिका हे गटई कामगारांना व्यवसायासाठी स्टॉल लावणे करीता जागेचा परवाना वितरीत करतील. सदर परवान्यातील अटी व शर्ती गटई कामगारांवर बंधनकारक राहतील.
३) गटई कामगारांना ४ फुट X ५ फुट मोजमापाची जागा देण्यात येईल. त्याप्रमाणे स्टॉलची बांधणी करता येईल. त्यापेक्षा आकारमान जास्त आढळून आल्यास स्टॉलचा परवाना जळगांव शहर महानगरपालिकेकडुन रद्द करण्यात येईल.
४) स्टॉलवर ठकळपणे दिसेल अशा अक्षरात जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांचे सौजन्याने परवाना क्रमांक बाबतचा मजकुर लिहिणे बंधनकारक राहील.
५) सदर स्टॉल अन्य त्र्यस्थ व्यक्तीला पोट भाड्याने देणार नाही.
६) गटई कामगारांना उपलब्ध करुन दिलेल्या जागेवरच स्टॉल लावता येईल अन्य ठिकाणी स्टॉल लावल्याचे निदर्शनास आल्यास देण्यात आलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
७) सदर जागेची मनपास आवश्यकता भासल्यास गटई कामगार हे २४ तासांच्या आत स्वत:हुन स्टॉल काढुन घेतील अथवा महापालिकेमार्फत स्टॉल हटविल्यास त्याचा खर्च गटई कामगारास देणे बंधन कारक राहील.
८) महानगरपालिकेने जागे करीता ठरवून दिलेले जागा भाडे रक्कम अगोदर पूर्ण भरणे आवश्यक राहील.
९) उपलब्ध करुन दिलेल्या जागेवर स्टॉलमुळे परीसरातील नागरिकांना उपद्रव झाल्यास किंवा स्टॉल उभारलेल्या परिसरातील नागरिकांच्या तक्रारी आल्यास व महापालिकेस तशी खात्री झाल्यास दिलेली परवानगी रद्द करण्यात येईल.
१०) मनपा ने वेळोवेळी जाहीर केलेल्या सुचनांचे पालन करणे, स्टॉलच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे गटई स्टॉलधारकास बंधनकारक राहील.
११) गटई कामगार व्यवसाय,स्टॉल करीता आवश्यक असलेले इतर परवाने सक्षम अधिकाऱ्याकडून घेऊन व्यवसाय सुरु करण्याची जबाबदारी गटई कामगाराची राहील.
१२) करारनामा गटई व्यवसायाकरीता दिलेल्या जागा भाडे,परवानगी संदर्भात असून कराराची मुदत ११ महिने राहील, कराराची मुदत संपण्याअगोदर करारास मुदतवाढीसाठी गटई स्टॉलधारक हे एक महिना अगोदर अर्ज करतील मुदतवाढ देण्याबाबत अंतिम अधिकार मा.आयुक्त सो. यांचा राहील.
१३) महानगरपालिकेने दिलेली परवानगी कुठलीही पूर्वसुचना न देता महापालिकेकडून एकतर्फी रद्द `करण्यात येईल त्या मागणीसाठी गटई कामगार स्टॉल धारक यांना न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही.
१४) गटई स्टॉल मुळे सार्वजनीक रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही अशा प्रकारे ठेवावा.
१५) गटई कामगारांनी स्टॉलवर फक्त गटई काम करावे व गटई कामाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे इतर वस्तू विक्रीसाठी ठेवू नये.
१६) भविष्यात सदरच्या स्टॉल मुळे रहदारीस अडथळा निर्माण झाल्यास सदरचे स्टॉल तात्काळ हटविण्यात येईल.
१७) ज्या व्यक्तीस स्टॉल करीता जागेचा परवाना दिलेला आहे त्या ठिकाणी त्याच व्यक्तीने व्यवसाय करावा.
१८) वरील पैकी कोणत्याही अटी शर्तीचा भंग केल्यास सदर परवानगी रद्द करण्यात येईल.

वरील शासन निर्णयातील व जळगांव शहर महानगरपालिकेने नमुद केलेल्या अटी व शर्ती नुसार गटई स्टॉल लावणे करीता अर्जदार यांना नगररचना विभागाने निश्चित केलेले जागा भाडे दर व अतिक्रमण विभागाच्या अभिप्रायानुसार जागा उपलब्ध करुन देता येईल तसेच जागांचे करार नूतणीकरण करता येतील.

तरी गटई कामगार यांना व्यवसाय करणे कामी भाडेतत्वार जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेसाठी मिळकत व्यवस्थापक, मालमत्ता व्यवस्थापन विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-०९** **प्रशासक ठराव क्र :-३३५** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव पा.पु.विभाग जा.क्र./१७९/२०२५-२६ दि.२७/१०/२०२५
३. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.१४/१०/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा दि.१४/१०/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१७/१०/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१७/१०/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** पा.पु.मशिनरी विभागा अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शहरातील पंपींग स्टेशन व तेथील सबस्टेशन येथे वार्षिक स्वरुपात बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्यासह दुरुस्तीचे कामे करणे या कामाचे अंदाजित रक्कमेस प्रशासकीय मंजुरी मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागा मधील सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात वाघुर रॉ वॉटर व शहरातील पंपींग स्टेशन व तेथील सबस्टेशन मेंटनन्स कामी बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्य पुरविणे व दुरुस्ती करणे कामांचे खालील प्रमाणे अंदाजित रक्कम रु.४९,९८,०००/- मात्र शासकीय करासह रक्कमेस शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता मिळालेली आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पा.पु.मशिनरी विभागा अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात शहरातील पंपींग स्टेशन व तेथील सबस्टेशन येथे वार्षिक स्वरुपात बाबवार दराप्रमाणे आवश्यकतेनुसार विविध उपकरणे व साहीत्यासह दुरुस्तीची कामे करणे. | रु.४९,९८,०००/- |

सदरचे कामे मनपा निधी अंतर्गत मशिनरी देखभाल व दुरुस्ती या लेखाशिर्ष अंतर्गत मंजुर केलेली बजेट तरतुद रक्कम रु.६० लक्ष इतकी तरतुदी मधून करणेत येईल. उक्त कामी निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेसाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-१०** **प्रशासक ठराव क्र :-३३६** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./शिक्षण वि./२१३१/२०२५-२६ दि.२८/१०/२०२५
३. प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांचा दि.०१/१०/२०२५ चा अभिप्राय.
४. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय.
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.३१/०७/२०२५ चा अभिप्राय.
६. उपायुक्त यांचा दि.१७/०९/२०२५ चाअभिप्राय.
७. अतिरीक्त आयुक्त यांचा दि.०३/१०/२०२५ चाअभिप्राय.
८. आयुक्त यांचा दि.१७/१०/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** प्रशासन अधिकारी म.न.पा. शिक्षण विभाग ज.श.म.न.पा. यांचे मागणी प्रतिवेदनात प्रस्तुत प्रकरणातील विषय हा जळगांव महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सन २०२५-२६ करिता दैनिक सकाळ NIF शैक्षणिक अंक सुरु करणे संदर्भात (जळगांव म.न.पा.संचलित २३ प्राथमिक शाळा (मराठी माध्यम-१२, उर्दु माध्यम-१० व हिंदी माध्यम-१) व ३ माध्यमिक शाळा (मराठी माध्यम-१, उर्दु माध्यम-२ अशा सुरु असुन त्याकरिता)

वाचा क्र.१ व प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ८ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

१) दैनिक सकाळ मिडिया प्रा.लि. यांचेकडील दिनांक १२/०६/२०२५ रोजीच्या पत्राचे अनुषंगाने., २) प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग, म.न.पा. जळगांव यांचेकडील दिनांक ३०/०६/२०२५ व ०४/०७/२०२५ तसेच दिनांक ०१/१०/२०२५ रोजीच्या प्रस्तुत प्रकरणातील प्रस्तावाच्या अनुषंगाने, ३) सन २०२५-२६ चे म.न.पा. अंदाजपत्रकातील म.बा.क.या शिर्षकाखाली ५% राखीव तरतुदीचे अनुषंगाने, ४) म.न.पा. महासभा / प्रशासक महासभा ३०२ दिनांक ११/०७/२०२५ चे मंजुर ठरवाचे अनुषंगाने. सकाळ मिडिया प्रा.लि. यांचेकडील दिनांक १२/०६/२०२५ रोजीच्या प्राप्त पत्राप्रमाणे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या हेतुने महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळेतील गरजू विद्यार्थ्यांसाठी सकाळ NIE चे १००० अंक मागणी नोंदणी करावयाची असुन वार्षिक एका अंकाकरीता रू.४००/- या प्रमाणे शुल्क आकारून अंक/ॲप व शैक्षणिक उपयुक्त भेट वस्तु उपलब्ध करून अंक सुरू करणेबाबत विनंती पत्र सादर केले आहे.

जळगांव शहर महानगरपालिका संचलित २३ प्राथमिक शाळा (मराठी माध्यम-१२, उर्दू माध्यम-१० व हिंदी माध्यम-१) तसेच ३ माध्यमिक शाळा (मराठी माध्यम-१ व उर्दू माध्यम-२) अशा सुरू असून म.न.पा.च्या २३ प्राथमिक शाळांमध्ये १ ली ते ८ मध्ये एकुण ४७११ विद्यार्थी शिक्षण घेत असुन माध्यमिक शाळांमध्ये इ.८ वी ते १० वी मध्ये ४५८ विद्यार्थी असे एकुण ५१६९ विद्यार्थी शिक्षण घेत आहे. सदरहू २६ शाळांमध्ये एकुण १७३ तुकड्या आहे. प्रती ५ विद्यार्थ्यांमागे १ संच असे १००० अंक / संचाची मागणी नोंदवून सुरू करावयाची आहे. परंतू शालेय शैक्षणिक वर्ष हे जुन ते एप्रिल असे आहे व महापालिका अंदाजपत्रकीय वर्ष हे एप्रिल ते मार्च असे आहे. करिता सदरचा सकाळ NIE हा अंक संच सन २०२५-२६ चे उर्वरित ५ महिन्यांचे कालावधीकरीता म्हणजे नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ पावेतोच्या कालावधीपर्यंत अंक / संचाची नोंदणी करून तसा अंक / संच सुरू करणेस येणाऱ्या खर्चास व त्यांना कार्यादेश देणेस तसेच सदर विषयाकरीता म.बा.क.५% निधीतुन खर्च करणे कामी आवश्यक अपेक्षित खर्चास सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता मिळणेसाठी प्रशासन अधिकारी, मनपा शिक्षण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ८ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४३** **(महासभा)**

**विषय क्र.:-११** **प्रशासक ठराव क्र :-३३७** **दिनांक :-२९/१०/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१२२/२०२५-२६ दि.२७/१०/२०२५
३. भांडारपाल यांचा दि.२७/१०/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.२७/१०/२०२५ चाअभिप्राय.
५. मुख्य लेखापरीक्षक यांचा दि.२७/१०/२०२५ चाअभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.२७/१०/२०२५ चाअभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक करीता येणाऱ्या अंदाजीत खर्चा करीता मान्यता मिळणे बाबत.

---

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे निर्देशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सार्वत्रिक निवडणूकीचे कामकाज सुरु करणेत आलेले आहे. त्या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीचे पुर्व तयारीच्या दृष्टीने आगामी काळात सदर निवडणुकी करीता भांडार विभागामार्फत खालील प्रमाणे साहित्य व सामुग्री खरेदी करणे / भाडे तत्वावर पुरवठा करणे आवश्यक आहे.

| अ.क्रं. | विषय | अंदाजे लागणारा खर्च |
|---|---|---|
| १. | मतपत्रिका व इतर मतदान साहित्य छपाई | ३५,००,०००.०० |
| २. | RO, ORO, बुथ, मतमोजणी ठिकाणी व इतर निवडणूक ठिकाणी लागणारी आवश्यक स्टेशनरी व फर्निचर | ५०,००,०००.०० |
| ३. | CCTV, Webcasting, Video graphic, Computer, Printer व इतर कामाकरीता साहित्य | १,३५,००,०००.०० |
| ४. | निवडणूक कामकाजा ठिकाणी मंडप व इतर साहित्य तसेच अधिकारी / कर्मचारी यांच्या करीता जेवण व नास्ता | ८०,००,०००.०० |
| | एकूण रक्कम रु. | ३,००,००,०००.०० |

वरील सार्वत्रिक निवडणूकीच्या कामकाजाकरीता अंदाजे रक्कम रु.३.०० कोटी मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्च निवडणूक खर्च या लेखाशिर्ष खाली करणेस मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**